MHKO070016852022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १८.१०.२०२२ |
| नोंदणी तारीख | : | १९.१०.२०२२ |
| निकाल तारीख | : | २६.०४.२०२३ |
| कालावधी | : | व. म. दि.<br>०० – ०६ – ०८ |

# मे. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर , जयसिंगपूर, ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर यांच्या न्यायालयात.

(पीठासीन अधिकारी - बिजेश आ. गायकवाड )

हिंदू विवाह अर्ज नं. २२७/२०२२
**CNR NO.: MHKO07-001685-2022**
निशाणी - /अ

१. श्री. संतोष आनंदा कांबळे,
व.व. ३६, धंदा - नोकरी,
रा. कुरुंदवाड, ता. शिरोळ,
जि. कोल्हापूर.

... अर्जदार.

२. सौ. सुनिता संतोष कांबळे,
व.व. २२, धंदा - काही नाही,
रा. द्वारा- श्री. संजय रामचंद्र कांबळे,
रा. उदगांव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

// विरुध्द् //

कोणीही नाही. ... वि.प.

हिंदू विवाह कायदा १९५५ कलम १३-ब प्रमाणे अर्ज.

-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-
अर्जदार नं. १ व २ तर्फे वकील - श्री. ए.डी. कांबळे.
-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

## न्या य नि र्ण य

(निकाल ता. २६/०४/२०२३ रोजी घोषित करणेत आला)

१. अर्जदार नं. १ व २ यांनी त्यांचे दि. ११/०२/२०१८ इ. रोजी झाले विवाहाचे विच्छेदन होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे -

अर्जदार क्र. १ व २ यांचा विवाह दि. ११/०२/२०१८ इ. रोजी तेरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे संपन्न झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार नं. २ या अर्जदार नं. १ यांचे घरी नांदण्याकरीता आल्या. अर्जदार नं. १ चे घरी एकत्र कुटुंब होते. लग्नानंतर ६ महिन्यातच अर्जदार नं. १ व २ यांच्यामध्ये प्रचंड वैचारिक मतभेद झाले. त्यामुळे अर्जदार नं. १ व २ यांच्यामध्ये भांडणाचे खटके उडत होते. सुमारे सहा महिन्याभरातच हे मतभेद इतक्या पराकोटीला पोहोचले की त्यातून त्यांचे एकमेकांपासून वेगळे रहाणे सुरु झाले. अर्जदार नं. २ या दि. ०९/०१/२०१९ इ. रोजीपासून माहेरी उदगांव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे रहात आहेत.

३. उभयतांमध्ये तडजोड करण्याचे प्रयत्न मध्यस्थांमार्फत केले, परंतु त्यात निष्कर्ष निघाले नाहीत. उभयतांनी वैयक्तिक मतभेद व भांडणतंटयामुळे त्यांची मने दुरावली. पुढे भविष्यामध्ये संसार सुखाचा होईल याची खात्री दोघांनाही नसल्याने उभयतांनी एकमेकांच्या संमतीने विवाह विच्छेदनाचा निर्णय घेतला व सदर अर्ज दाखल केला. उभयतांनी विनंती केली की, हिंदू विवाह कायद्याप्रमाणे उभयतांचा विवाह विच्छेदन झाल्याचे जाहीर होऊन मिळावे व तसा हुकूमनामा

करण्यात यावा.

४. अर्जदार यांच्याकडून अर्जातील कथनांची पडताळणी केली असता त्यांनी मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले व अर्जदार एकमेकांपासून दिनांक ०९/०१/२०१९ पासून म्हणजेच गेल्या चार वर्षाहून अधिककाळपासून विभक्त रहात आहेत व प्रतिष्ठांमार्फत व इतर इसमांमार्फत प्रयत्न होऊन सुध्दा पुन्हा पती पत्नी म्हणून एकत्र रहाणे शक्य नसल्याचे सांगितले.

५. अर्ज दि. १८/१०/२०२२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जदार हे गेल्या चार वर्षाहून अधिककाळापासून विभक्त रहात आहेत. त्यामुळे संमतीने घटस्फोट घेण्यासाठी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांचे मनपरिवर्तन होण्याकरीता कायदयाने दिलेल्या सहा महिन्याच्या कालावधीची अट प्रस्तुत प्रकरणात शिथील करण्यात आलेली आहे. उभयतांचे मतभेद व पती पत्नी म्हणून न राहण्याची मानसिकता बदललेली नाही व त्यांचे पती पत्नीचे नाते प्रस्थापित होऊ शकले नाही.

६. उभयतांना न्यायालयाच्या मध्यस्थीने समजावून सांगून विवाह संबंध प्रस्थापित करणेस सुचविले असता त्यास उभयतांनी नकार दिला व विवाह विच्छेदनाचा विचार ठाम असल्याचे सांगून अर्ज मंजूर करण्यास विनंती केली.

७. अर्जदार नं. १ व अर्जदार नं. २ यांनी त्यांची शपथपत्रे अनुक्रमे निशाणी ७ व ८ वर दाखल केली आहेत. अर्जातील कथनांचे व शपथपत्रातील मजकुराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, उभयतांमध्ये वैचारीक मतभेद व भांडनतंटयामुळे ते गेल्या चार वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून विभक्त राहू लागले. तेंव्हापासून त्यांचा पती पत्नी म्हणून संबंध आलेला नाही. उभयतांना पुन्हा पती पत्नी म्हणून एकत्र राहण्याची शक्यता नसल्याने त्यांनी संमतीने विवाह

विच्छेदन करुन एकमेकांपासून विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे.

८. वरील सर्व विवेचनांचा विचार करता प्रामुख्याने लक्षात येते की, अर्ज दाखल तारखेपूर्वी चार वर्षाहून अधिककाळपासून अर्जदार एकमेकांपासून विभक्त रहात आहेत. प्रयत्न करुनही त्यांचे मन परिवर्तन झाले नाही. या सर्व बाबी हिंदू विवाह कायदा,१९५५ कलम १३-ब च्या तरतुदींची पूर्तता करतात. म्हणून अर्जदार विवाह विच्छेदन करून मिळण्यास पात्र ठरतात. परिणामी खालील आदेश पारित करण्यात येतो.

आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार नं. १ श्री. संतोष आनंदा कांबळे आणि अर्जदार नं. २ सौ. सुनिता संतोष कांबळे यांचे दि. ११/०२/२०१८ इ. रोजी झालेल्या विवाहाचे आज दिनांक २६/०४/२०२३ पासून विच्छेदन झाल्याचे जाहिर करण्यात येते.

३. वरील आदेशाप्रमाणे हुकूमनामा तयार करणेत यावा.

Digitally signed by BIJESH ABASAHEB GAIKWAD
Date: 2023.04.27 13:42:30 +0530

दिनांकः २६/०४/२०२३.

(बिजेश आ. गायकवाड )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.